मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# दर्जेदार इंग्रजी शिक्षणाचे स्वप्न होणार साकार!

## महापालिकेचे पाऊल : दिघीत सीबीएससी शाळेचा प्रस्ताव तर भोसरीतही इंग्रजी शाळा

**पिंपरी | प्रतिनिधी**

आपल्या मुला-मुलींनी शिकून मोठं व्हावे. त्यांना चांगले शिक्षण मिळावे, असे प्रत्येक पालकांचे स्वप्न असते. त्यांचे हेच स्वप्न साकार करण्यासाठी महापालिकेकडून प्रयत्न केले जात असून त्याचा एक भाग म्हणून दिघीत आता महापालिकेच्या शाळेत सीबीएससी माध्यमाची शाळा सुरू केली जाणार आहे. भोसरीतील इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या इमारतीचेही जवळपास पूर्ण झाले आहे. त्यामुळे, येत्या शैक्षणिक वर्षापासून सर्वसामान्य कुटुंबातील मुला-मुलींना दर्जेदार इंग्रजी शिक्षण मिळण्याची आशा पल्लवित झाली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्यासाठी सज्ज झाल्याने भविष्यात मराठी माध्यमासह इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा पर्यायही सर्व ठिकाणी उपलब्ध होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



भोसरीतील महापालिकेच्या राजे श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पहिली ते सातवीचा पट ४७० इतका आहे. तर वर्गखोल्या फक्त सात आहेत. त्यामुळे एका वर्ग खोलीत सरासरी सुमारे ६५ ते ७० विद्यार्थी बसतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकांना अडचणी निर्माण होत आहे. विद्यार्थ्यांना वर्गात बसण्यास पुरेशी जागा नसल्याने शाळेद्वारे विद्यार्थ्यांचा प्रवेश देताना शाळा प्रशासनाला कसरत करावी लागत आहे. या शाळेत आणखी दहा शिक्षकांची कमतरता आहे.

### येत्या जूनपासून शाळा सुरू?

» भोसरी गावठाणात इंग्रजी माध्यमासह मराठी माध्यमासाठीच्या इमारतीच्या उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे येत्या नवीन शैक्षणिक वर्षात जूनपासून या नवीन शाळेमध्ये इंग्रजी माध्यमासह मराठी माध्यमांची शाळा सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तर दिघीतील गोकुळनगमध्ये महापालिकेद्वारे शाळेच्या इमारतीचे स्थापत्य विभागाचे काम पूर्ण झाले आहे. तर या ठिकाणी सुरू असलेले विद्युत विभागाचे कामही अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे येत्या जूनमध्ये ही शाळा सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

> भोसरीतील महापालिकेच्या शाळेच्या इमारतीचे काम ९५ टक्के पूर्ण झाले आहे. येत्या महिन्यात स्थापत्य विभागाचे काम पूर्ण होईल. त्यानंतर विद्युत विभागाचे काम सुरू होईल.
>
> **- शैलेंद्र चव्हाण, उपायुक्त (स्थापत्य), ई प्रभाग क्षेत्रीय कार्यालय.**

---

# लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप समाजासाठी प्रेरणादायी अध्याय

## त्यांनी निष्ठा, सामर्थ्य आणि सेवाभावाने समाजाच्या विकासासाठी आयुष्य वेचले : चंद्रकांतदादा पाटील

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्वर्गीय लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप हे फक्त नाव नसून समाजासाठी प्रेरणादायी अध्याय आहेत. त्यांनी निष्ठा, सामर्थ्य, आणि सेवाभावाने समाजाच्या विकासासाठी आयुष्य वेचले होते, असे गौरवोद्गार उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज (शनिवारी) काढले.

पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासाची दूरदृष्टी ठेवत लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या स्मृतींना अर्पण करण्यात येणाऱ्या 'शक्तिस्थळ' प्रकल्पाचे भूमिपूजन समारंभात ते बोलत होते. त्यावेळी केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, माजी मंत्री आमदार डॉ.तानाजीराव सावंत, मावळ लोकसभा खासदार श्रीरंग बारणे, पुणे महापालिका शिक्षण मंडळाचे माजी उपाध्यक्ष विजयआप्पा रेणुसे, भोसरी विधानसभा आमदार महेशदादा लांडगे, पिंपरी विधानसभा आमदार अण्णा बनसोडे, भोर विधानसभा आमदार शंकर मांडेकर, मावळ विधानसभा आमदार सुनील शेळके, विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे तसेच कार्यक्रमाचे निमंत्रक माजी आमदार अश्विनी जगताप, आमदार शंकर जगताप, गोसेवक विजूशेठ जगताप तसेच अनेक मान्यवर पदाधिकारी, जगताप परिवाराचे नातेवाईक कार्यकर्ते, लक्ष्मणभाऊंबरोबर काम केलेले सर्व जुने सहकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी प्रकल्पाला शुभेच्छा देत सांगितले की, "शक्तिस्थळ हा प्रकल्प समाजाच्या उन्नतीसाठी एक प्रेरणादायी संदेश ठरेल. हा प्रकल्प पिंपरी-चिंचवड शहराला एक नवीन ओळख मिळवून देईल."

पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासाची दूरदृष्टी ठेवत लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या स्मृतींना अर्पण करण्यात येणाऱ्या "शक्तिस्थळ" प्रकल्पाद्वारे निष्ठा, सामर्थ्य, सेवाभाव आणि दातृत्वाचे प्रतीक असलेल्या लक्ष्मणभाऊंच्या स्मृती जपण्याबरोबरच भावी पिढ्यांना प्रेरणा देणे हा उद्देश आहे. या प्रकल्पामध्ये युवकांसाठी अभ्यासिका, सांस्कृतिक प्रदर्शन, आणि प्रेरणादायी स्मृती स्थळ यांचा समावेश असेल. या माध्यमातून समाजसेवेचा संदेश देणारे स्मारक उभारण्याचा संकल्प जगताप परिवार व लक्ष्मणभाऊंच्या मित्रपरिवाराने केला आहे.

भूमिपूजन समारंभात उपस्थित असलेल्या नागरिकांनी लक्ष्मणभाऊंच्या स्मृतींना श्रद्धांजली वाहली. 'शक्तिस्थळ' हा केवळ प्रकल्प नसून, समाजातील प्रत्येक घटकाला एकत्र जोडणारा पूल ठरणार आहे. हे स्मारक समाजासाठी उर्जेचे स्थळ आणि प्रेरणेचा स्रोत ठरेल, असा विश्वास सर्व मान्यवरांनी व्यक्त केला.

माजी महापौर सौ.माई ढोरे, भाजपा कार्यकारी शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे, राष्ट्रवादी पक्षाचे नेते विठ्ठल उर्फ नाना काटे, कार्यसिद्धी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गिरीराज सावंत, माजी नगरसेवक प्रशांत शितोळे, मोरेश्वर भोंडवे, बापू भेगडे, पै.हनुमंत गावडे, संदीप जाधव, उमेश चांदगुडे, हभप पंकज महाराज गावडे, जयदीप खापरे तसेच सर्व माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि लक्ष्मणभाऊंवर नितांत प्रेम करणारे सर्व बंधू-भगिनी आवर्जून उपस्थित होते.

# तिसरे विश्व मराठी संमेलन यंदा पुण्यात

## फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर 31 जानेवारीपासून प्रारंभ : मंत्री उदय सामंत यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागातर्फे आयोजित तिसरे विश्व मराठी संमेलन यंदा पुण्यात होईल. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत हे संमेलन होणार असल्याची घोषणा मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केली. संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी केंद्रीय सांस्कृतिकमंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित राहणार आहेत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिलेच विश्व मराठी संमेलन आहे.



यापूर्वीची दोन संमेलने अनुक्रमे मुंबई आणि नवी मुंबई येथे झाली होती. सामंत यांनी सांगितले की, 'आंतरराष्ट्रीय दर्जाचे लिखाण केलेल्या एका ज्येष्ठ साहित्यिकाचा आणि मराठी भाषेत कार्य करून आज लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचलेल्या एका तरुणाचा सन्मान करण्याच्या उपक्रमाची या संमेलनापासून सुरुवात करीत आहोत. याअंतर्गत यंदा ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक आणि अभिनेते रितेश देशमुख यांचा गौरव करण्यात येईल. संमेलनात तरुण केंद्रस्थानी असतील.

### परदेशातील लेखक, साहित्यप्रेमींना आमंत्रण

**» गतवर्षी विश्व मराठी संमेलनात परदेशातील मराठी व्यक्तींना संमेलनात बोलावण्यासाठी वारेमाप खर्च करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर यंदाच्या संमेलनात परदेशस्थ मराठी व्यक्तींच्या सहभागाबाबत सामंत म्हणाले, "या व्यक्ती परदेशात राहत असल्या तरी आपल्या महाराष्ट्राच्याच आहेत. त्यांना संमेलनात सहभागी होता यावे म्हणून गतवेळी प्रवासाचा खर्च देण्यात आला होता. यंदाही जगभरातील मराठी भाषिकांनी सहभागी व्हावे, असा आमचा प्रयत्न असेल.**

संमेलनाबाबत पुण्यातील बहुतेक साहित्यिकांशी चर्चा झाली असून, त्यांच्या सूचना जाणून घेतल्या आहेत. त्यानुसार बालसाहित्यापासून संतसाहित्य आणि लोककलांपर्यंत प्रत्येक बाबीचा समावेश कार्यक्रमांत असेल. उद्घाटनाच्या दिवशी बालगंधर्व रंगमंदिरापासून फर्ग्युसन महाविद्यालयापर्यंत शोभायात्रा काढण्यात येईल. तरुण-ज्येष्ठ कवींचे काव्यसंमेलन, मराठी भाषेच्या अभिजात दर्जावरील चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद आदींचा समावेश संमेलनात असेल. याची सविस्तर कार्यक्रम पत्रिकाही लवकरच जाहीर करण्यात येईल, असेही सामंत यांनी नमूद केले.

---

# महापालिकेच्या वतीने साजरा होणार 'पर्पल जल्लोष-उत्सव दिव्यांगांचा'

## दिव्यांगांसाठीचा पहिलाच भव्य उत्सव : आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

दिव्यांग बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेऊन त्यांच्यातील आत्मविश्वास वाढवण्यासाठी तसेच त्यांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दिव्यांग भवन फाऊंडेशनच्या वतीने पर्पल जल्लोष –दिव्यांगांचा महाउत्सव साजरा करण्यात येणार आहे. हा तीन दिवसीय महोत्सव चिंचवड येथील ऑटो क्लस्टर प्रदर्शनी केंद्र येथे १७ , १८, १९ जानेवारी २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. भारतातील कुठल्याही स्थानिक स्वराज्य संस्थेतर्फे आयोजित करण्यात येणारा हा दिव्यांगांसाठीचा पहिलाच भव्य उत्सव असून दिव्यांगांच्या कल्याणासाठी उचललेले एक अग्रगण्य पाऊल असल्याचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सांगितले.

पर्पल जल्लोष हा महोत्सव दिव्यांगांची प्रतिभा आणि त्यांच्या




नवकल्पनांना वाव देणारा तसेच दिव्यांगांच्या क्षमतामध्ये वाढ करणारा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या महोत्सवाचा उद्देश सामाजिक विकासातील अडथळे दूर करण्यास चालना देणे, दिव्यांगाबाबत समाजात असलेल्या प्रचलित विचारांविषयी प्रबोधन करणे, दिव्यांग व्यक्तीं विषयी समाजात असलेले नकारात्मक समज बदलण्यासाठी प्रोत्साहन देणे, त्यांचे सर्वांगीण समावेशन करण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे, हा या महोत्सवाचा हेतू असल्याचे आयुक्त सिंह यांनी सांगितले.

### चर्चासत्र, सांस्कृतिक कार्यक्रम, फॅशन शो आणि रोजगार मेळाव्याचे आयोजन..

पर्पल जल्लोष महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींच्या तसेच विद्यार्थ्यांच्या कलात्मक आणि सर्जनशील कौशल्याचे प्रदर्शन तसेच त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी कलामंच उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामध्ये दिव्यांग नृत्य, गायन, अभिनय, गझल, कविता साहित्य संमेलन, अभिनय, फॅशन शो यासारखे विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. तसेच दिव्यांगांच्या जीवनावर आधारित लेखन, साहित्य त्यांच्या प्रेरणादायी कथा आणि प्रवासाचा उलगडा करणारे विशेष सत्र देखील

### सहाय्यक साधने आणि तंत्रज्ञान एक्स्पोचे आयोजन..

**» या उत्सवामध्ये दिव्यांगांसाठी कार्यरत असलेल्या ४० पेक्षा जास्त स्टार्टअप्स, विविध कार्पोरेट कंपन्या आणि विविध संस्था सहभागी होणार आहेत. याठिकाणी दिव्यांगांबाबतच्या सेवांची माहिती देणारे स्टॉल्स उभारणार असून प्रदर्शने देखील भरवली जाणार आहेत. सहभागी कंपन्याकडून दिव्यांगांसाठीच्या नवीन कल्पना, तंत्रज्ञान प्रदर्शनात मांडण्यात येणार आहेत. याशिवाय केंद्र सरकार, राज्य सरकार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि दिव्यांग भवन फाऊंडेशनच्या वतीने दिव्यांगांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती दिव्यांग व्यक्तींसह इतर नागरिकांना व्हावी यासाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात येणार आहेत. शिवाय दिव्यांगांसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन देखील करण्यात येणार असून त्यांच्या कौशल्यानुसार त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी त्यांची नोंदणी केली जाणार आहे.**

याठिकाणी आयोजित करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी दिव्यांगांच्या स्थानिक संस्थाकडून खाद्यपदार्थांचे स्टॉल्स उभारण्यात येणार असून ते स्टॉल्स दिव्यांग व्यक्ती चालवणार आहेत. या स्टॉल्सच्या माध्यमातून चौपाटीवर काम करणाऱ्या सर्व दिव्यांग व्यक्तींना रोजगार मिळेल, तसेच ग्राहकांना रुचकर व स्वादिष्ट खाद्यपदार्थांचा आस्वाद घेता येणार आहे.

पर्पल जल्लोष महोत्सवात विविध क्षेत्रातील कंपन्या, स्वयंसेवी संस्था, संशोधक आणि नवकल्पक विद्यार्थी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दिव्यांग भवन फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

# पीएमआरडीए कार्यालयात नियम धाब्यावर?

## मनाई असतानाही वाढला मोबाईलचा वापर, अधिकारी-कर्मचाऱ्यांची हेल्मेटसक्ती कागदावरच

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) अंतर्गत अधिकारी, कर्मचारी तसेच विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना स्वतंत्र नियम घालून देण्यात आले आहेत. मात्र, हे नियम पायदळी तुडवले जात असल्याचे चित्र आहे. त्यामुळे नववर्षामध्ये पुन्हा या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे दोन महिन्यांपूर्वी कंत्राटी कर्मचाऱ्यांना मोबाईल वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. प्रत्यक्षात या आदेशाचे पालन सुरुवातीचे चार दिवस करण्यात आले. त्यानंतर कर्मचाऱ्यांच्या हातामध्ये सर्रासपणे मोबाईल दिसून येत आहे.




प्राधिकरण कार्यालयातील वेगवेगळ्या विभागामध्ये कंत्राटी स्वरूपात जवळपास पावणेदोनशे कर्मचारी कार्यरत आहेत. बीव्हीजी कंपनीच्या माध्यमातून ते विविध कार्यालयात वेगवेगळ्या पदावरती काम करत आहेत. शिपायापासून ते अभियंता पदापर्यंतचे कर्मचारी कंत्राटी स्वरूपात घेण्यात आले आहेत.

दरम्यान, या कर्मचाऱ्यांना प्राधिकरण प्रशासनामार्फत वेगवेगळे नियम घालून देण्यात आले आहेत. त्यामध्ये वेळ पाळणे, दिलेल्या कामांमध्ये दर्जा राखणे यासोबतच मोबाईल वापरण्यास मनाई आहे. नोव्हेंबर महिन्यामध्ये याबाबत प्रशासनाने परिपत्रक काढून प्रत्येक विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना मोबाईल वापरण्याबाबत बंदी घातली आहे. नोव्हेंबरच्या काही महिन्यांमध्ये याबाबत सक्ती करण्यात आली होती. त्यानंतर हळूहळू ही सक्ती कमी झाल्याने मोबाईल वापरण्यामध्ये वाढ झालेली आहे. कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळच सुरक्षारक्षकांमार्फत त्याची तपासणी केली जात होती. मात्र, कंत्राटी कर्मचारी ती तपासणी चुकवून मोबाइल आत नेतात. त्यामुळे आता पुन्हा एकदा याबाबत पत्रक काढण्याची वेळ प्रशासनावर आलेली आहे. यापूर्वी प्राधिकरणातील गोपनीय कागदपत्रे, परवाने याचे फोटो मोबाईलच्या माध्यमातून बाहेर लीक झाले होते. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी मोबाईल वापरावरती निर्बंध आणले होते. मात्र त्याचे पालन होताना दिसून येत नाही.

### हेल्मेट सक्तीबाबत ठोस कारवाई कधी?

आकुर्डी येथील कार्यालयात येणारे कर्मचारी, नागरिक अथवा व्हिजिटर्स यांना दुचाकीवर आत येताना हेल्मेट परिधान करणे सक्तीचे करण्यात आले होते. मात्र, त्याबाबत कोणती ठोस कार्यवाही झाली नव्हती. त्यामुळे येत्या काळामध्ये काय बदल होतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### ड्रेसकोड होणार अनिवार्य

» पीएमआरडीए कार्यालयात असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना एक जानेवारीपासून ड्रेसकोड अनिवार्य करण्यात येणार आहे. संबंधित बीव्हीजी कंपनीने करारात नमूद केल्याप्रमाणे हा ड्रेसकोड कर्मचाऱ्यांना अनिवार्य आहे. त्यामुळे लवकरच या कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेशभूषेत बदल करावा लागणार आहे. त्यामुळे त्या व्यतिरिक्त इतर कोणताही ड्रेस वापरता येणार नाही.

“ मोबाईल बंदीबाबत पुन्हा एकदा सर्व विभागांना सूचना करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे सर्व नागरिकांना व कर्मचाऱ्यांना प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक राहणार आहे. उल्लंघन झाल्यास आयुक्तांच्या आदेशानुसार कारवाई करावी लागणार आहे.

- सुनील पांढरे, सह-आयुक्त पीएमआरडीए.

# पिंपरी-चिंचवडमध्ये जळीत रुग्ण कक्ष सुरू करण्याबाबत उदासीनता

## महापालिकेने जागा पाहणीत घालवले दीड वर्ष, रुग्णांची हेळसांड सुरूच

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील आगीच्या विविध घटनांत भाजलेल्या रुग्णांवर वेळेत उपचार मिळत नसल्याने त्या रुग्णांची मोठ्या प्रमाणात हेळसांड सुरू आहे. जळीत रुग्ण कक्षासाठी जागा पाहणीतच महापालिकेने दीड वर्ष घालवल्याने नागरिक संताप व्यक्त करीत आहेत.



शहरातील जळीत रुग्णांना वायसीएम रुग्णालय प्राथमिक उपचार घेऊन त्यांना पुढील औषधोपचारासाठी पुण्यातील ससून रुग्णालयात यावे लागत आहे. त्यामुळे शहरात जळीत रुग्ण कक्ष तयार करण्यासाठी आयुक्त शेखर सिंह यांनी वैद्यकीय विभागातील डॉक्टरांना घेऊन वायसीएम, थेरगांव, आकुर्डी, चिंचवड रुग्णालयात पाहणी केली. पण ‘इथे नको, तिथे..’ असे म्हणत दीड वर्ष होऊनदेखील महापालिकेच्या जळीत रुग्ण कक्षाला अद्याप मुहूर्त मिळालेला नाही.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने विविध रुग्णालयांची आयुक्त शेखर सिंह यांनी पाहणी केली. त्यानुसार भाजलेल्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी जळीत रुग्ण उपचार कक्ष (बर्न वॉर्ड) अगोदर वायसीएम रुग्णालयात तयार करण्यात येणार होता. त्यानंतर यात बदल करून आकुर्डी आणि थेरगांव रुग्णालयातदेखील पाहणी करून चाचपणी करण्यात आली. मात्र, रुग्णालयात बाह्यरुग्ण विभागात दररोज येणाऱ्या रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे त्या रुग्णालयात जळीत रुग्ण कक्ष बनवण्याचा निर्णय रद्द केला.

चिंचवडगाव येथील जुने तालेरा रुग्णालय हे नवीन इमारतीत स्थलांतरित करण्यात येणार आहे. त्यानंतर जुन्या इमारतीतील तिसऱ्या मजल्यावर जळीत रुग्ण कक्ष तयार करण्याचे महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने ठरविले आहे. यासाठी दीड वर्ष लोटूनही कोणतीच तयारी केलेली नाही. तालेरा रुग्णालयात एकूण ३० खाटांचा बर्न वॉर्ड नवीन वर्ष सुरू झाल्यानंतरही सुरू होऊ शकलेला नाही.

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्येत वाढ झाली आहे. आग लागण्याच्या घटनेत प्रचंड वाढ झाली आहे. त्या घटनेत जीवितहानी झाल्यानंतर जळीत रुग्ण कक्ष नसल्याने रुग्णांची प्रचंड हेळसांड होते.

महापालिकेकडून यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (संत तुकारामनगर-पिंपरी), थेरगाव रुग्णालय, आकुर्डी रुग्णालय, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले रुग्णालय (तालेरा रुग्णालय, चिंचवड), भोसरी रुग्णालय, सांगवी रुग्णालय, यमुनानगर रुग्णालय, जिजामाता रुग्णालय (पिंपरी) आदी रुग्णालये चालविण्यात येतात.

### आणखी काही महिने करावी लागेल प्रतीक्षा

» जुन्या तालेरा रुग्णालयात नियोजित असलेला जळीत रुग्ण उपचार कक्ष (बर्न वॉर्ड) पूर्ण क्षमतेचे कार्यरत होण्यासाठी अजून काही महिने वाट पाहावी लागणार आहे. जुन्या तालेरा रुग्णालयाचे स्थलांतर नवीन तालेरा रुग्णालयात झाल्यानंतरच या ठिकाणी बर्न वॉर्डचे काम करता येणार आहे. त्यामुळे बर्न वॉर्डसाठी चिंचवडमध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या तालेरा रुग्णालयाचे काम पूर्ण होऊन ते सुरू होण्याची वाट पाहावी लागणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या वैद्यकीय विभागाचे प्रमुख डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी दिली.

# पर्वती टेकडीवरील पेशवे स्मारकाचे काम समाधानकारक

## पहिल्या टप्प्याचे केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते लोकार्पण होणार : मंत्री चंद्रकांत पाटील यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील पर्वती टेकडीवरील श्रीमंत बाजीराव पेशवे आणि नानासाहेब पेशवे स्मारकाच्या विकासाचे काम समाधानकारक झाले असून, पहिल्या टप्प्यातील विकासकामांचे लोकार्पण केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते करण्यात येईल, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण आणि संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.



पुण्यातील पर्वती टेकडीवर बाजीराव पेशवे स्मारक आणि नानासाहेब पेशवे संग्रहालयाचा विकास व्हावा; यासाठी चंद्रकांत पाटील आग्रही असून, जिल्हा नियोजन, आमदार निधी आणि लोकसहभागातून विकास करण्यात येत आहे. यामध्ये पर्वती टेकडीवरील श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या पुर्णाकृती पुतळा परिसराच्या सुशोभीकरणासह; भारताचा उज्वल इतिहास आणि पेशवे कालीन इतिहासावर आधारित भित्तीचित्रे साकारण्यात येत आहेत.

या सर्व कामाची पाहणी पाटील यांनी करून आढावा घेतला. यावेळी भाजप प्रदेश प्रवक्ते संदीप खर्डेकर, पेशव्यांचे वंशज पुष्कर पेशवे, देवदेवेश्वर संस्थाचे रमेश भागवत, शिल्पकार विवेक खटावकर आदी उपस्थित होते. या पाहणीनंतर माध्यमांशी संवाद साधताना पाटील म्हणाले की, आठ महिन्यांपूर्वी पर्वती टेकडीच्या विकासाचा विषय समोर आला होता. श्रीमंत बाजीराव पेशवे स्मारक आणि नानासाहेब पेशवे स्मारक परिसराच्या सुशोभीकरणासाठी सादरीकरण देखील झाले होते. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील कामांसाठी पालकमंत्री पदाच्या कार्यकाळात जिल्हा नियोजन आणि स्थानिक आमदार माधुरी मिसाळ यांच्या आमदार निधीतून भरीव निधी उपलब्ध करून दिला होता. यातील काही कामे शासनाच्या नियमात बसत नसल्याने सीएसआर निधीतून ती पूर्ण करण्यात आली. ही सर्व कामे अतिशय उत्तम दर्जाची झाली आहेत.

ते पुढे म्हणाले की, पहिल्या टप्प्यातील कामाचे केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते लोकार्पण व्हावे, असा प्रयत्न आहे. तसेच, पुढील टप्प्यांचे देखील काम लवकरच सुरु करणार असून; कामांची यादी तयार करुन सादर करण्याच्या सूचना देवदेवेश्वर संस्थान आणि स्मारक विकास समितीला केली असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

पर्वती टेकडीच्या विकासाचा विषय आठ महिन्यांपूर्वी समोर आला होता. श्रीमंत बाजीराव पेशवे स्मारक आणि नानासाहेब पेशवे स्मारक परिसराच्या सुशोभीकरणासाठी सादरीकरण देखील झाले होते. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील कामांसाठी पालकमंत्री पदाच्या कार्यकाळात जिल्हा नियोजन आणि स्थानिक आमदार माधुरी मिसाळ यांच्या आमदार निधीतून भरीव निधी उपलब्ध करून दिला होता. यातील काही कामे शासनाच्या नियमात बसत नसल्याने सीएसआर निधीतून ती पूर्ण करण्यात आली. ही सर्व कामे अतिशय उत्तम दर्जाची झाली आहेत. पहिल्या टप्प्यातील कामाचे केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते लोकार्पण व्हावे, असा प्रयत्न आहे. पुढील टप्प्यांचे काम देखील लवकरच सुरू करणार असून; कामांची यादी तयार करून सादर करण्याच्या सूचना देवदेवेश्वर संस्थान आणि स्मारक विकास समितीला केली आहे, अशी माहिती पाटील यांनी दिली.

### संग्रहालयाचा विकास व्हावा

» पुण्यातील पर्वती टेकडीवर बाजीराव पेशवे स्मारक आणि नानासाहेब पेशवे संग्रहालयाचा विकास व्हावा; यासाठी चंद्रकांत पाटील आग्रही असून, जिल्हा नियोजन, आमदार निधी आणि लोकसहभागातून विकास करण्यात येत आहे. यामध्ये पर्वती टेकडीवरील श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसराच्या सुशोभीकरणासह; भारताचा उज्वल इतिहास आणि पेशवे कालीन इतिहासावर आधारित भित्तीचित्रे साकारण्यात येत आहेत. पाटील यांनी या सर्व कामाची पाहणी करून आढावा घेतला. यावेळी भाजप प्रदेश प्रवक्ते संदीप खर्डेकर, पेशव्यांचे वंशज पुष्कर पेशवे, देवदेवेश्वर संस्थेचे रमेश भागवत, शिल्पकार विवेक खटावकर आदी उपस्थित होते.

# बारामतीचे दहावे कृषी प्रदर्शन गुरुवारपासून

## माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन होणार

**पुणे | प्रतिनिधी**

ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित कृषी विज्ञान केंद्र, बारामतीमार्फत गेल्या दहा वर्षांपासून कृषिक हे भारतातील नव्हे तर जगातील सर्वात मोठे प्रात्यक्षिक आधारित कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. यावर्षीचे १० वे कृषिक प्रदर्शन दि. १६ ते २० जानेवारीदरम्यान होत असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन राजेंद्र पवार यांनी दिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश नलवडे उपस्थित होते.




दि १५ रोजी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, पशुसंवर्धन मंत्री तसेच क्रीडामंत्री दत्तात्रेय भरणे उपस्थित राहणार आहेत. पंधरा तारखेच्या उद्घाटनानंतर दि. १६ तारखेपासून हे प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी खुले राहणार आहे.

थेट प्रात्यक्षिकावर आधारीत कृषी प्रदर्शनाचे हे १० वे वर्ष आहे. दरवर्षी देशभरातून अडीच ते तीन लाख शेतकरी भेट देतात. तब्बल १७० एकर प्रक्षेत्रावर प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. राजेंद्र पवार हे १९८० च्या दशकात अमेरिकेतील मिशिगन स्टेटमध्ये कृषी पदवीचे शिक्षण घेत असताना मिनिसोटा कॉन्टीमध्ये त्यांनी अशा प्रकारचे प्रात्यक्षिक आधारित प्रदर्शन पाहिले होते.

नवीन बियाणे, तंत्रज्ञान, खते केवळ पिशव्यांमधून दाखविण्याऐवजी त्यांचा प्रत्यक्ष शेतीतील वापर, त्यांचा त्या पिकावरील प्रभाव व प्रत्यक्ष उत्पादन पाहता येत असल्याने ते अधिक प्रभावी ठरते, याच संकल्पनेतून दरवर्षी हे प्रदर्शन भरविले जाते.

### कृत्रिम बुद्धिमत्तेची संकल्पना

» सीईंग इज बिलीव्हींग या उक्तीनुसार प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय विश्वास ठेवला जात नाही. दहा वर्षे जगभरातील प्रगत व अद्ययावत तंत्रज्ञान शेतीत वापरले जावे, त्यातून शेतीचा उत्पादन खर्च कमी व्हावा व उत्पादन वाढावे या हेतूने या प्रदर्शनाची संकल्पना आखली. दरवर्षी नवनवी संकल्पना घेऊन प्रदर्शनाची सुरवात केली गेली. जागतिक स्तरावरील विकसित तंत्रज्ञान पाहता येणार आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेची संकल्पना हे या कृषी प्रदर्शनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.